तरुण भारत
संवाद
रविवार, १६ जून २०१९

# महाराष्ट्र बटालियनचे युनिट हळबे महाविद्यालयाला मंजूर



दोडामार्ग : विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील. समीर ठाकुर

**दोडामार्ग :** येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयाला ५८ महाराष्ट्र बटालियनचे एन. सी.सी. युनिट मंजूर झाले असून जुलैच्या तिसऱ्या सप्ताहात या युनिटचे उद्घाटन होणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी दिली. गेली काही वर्षे महाविद्यालयात एन. सी. सी. (राष्ट्रीय छात्र सेना) युनिट सुरू व्हावे, यासाठी प्राचार्य डॉ. पाटील प्रयत्नशील होते. त्यानुसार एन.सी.सी. अधिकाऱ्यांनी गेल्या महिन्यात महाविद्यालयात भेट देऊन पाहणी केली व ५४ कॅडेटचे युनिट मंजूर केले. या युनिटमध्ये विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयवृत्ती, शिस्त निर्माण होण्यास मदत होणार असल्याने विद्यार्थी वर्गात उत्साह निर्माण झाला आहे. राष्ट्रीय शास्त्र सेनेचे व्यासपीठ विद्यार्थ्यांना मिळणार असून निवडक व नियमित विद्यार्थ्यांनाच या युनिटमध्ये प्रवेश मिळणार असल्याने विद्यार्थ्यांनी त्वरित प्रवेश घेऊन एन.सी.सी. मध्ये आपले स्थान निश्चित करावे, असे आवाहन एन.सी.सी. विभागाचे प्रमुख प्रा. प्रशांत ढेपे यांनी केले आहे. दरम्यान, महाविद्यालयात सर्वप्रथम प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांनी प्रातिनिधिक स्वरुपात पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

Scanned by CamScanner